दै. देशोन्नती दि. 02/03/2023

# चोरट्यांनी जबरीने चोरुन नेलेली सोन्याची चैन पत्रकार तुकाराम सावंत यांना केली परत



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नादेड** ▪ येथील ग्रामीण पोलीसांनी आरोपीकडून गुन्ह्यातील १ लाख ५६ हजार रुपये किमतीची ३० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी हस्तगत करुन मामीण अप्पर पोलिस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या उपस्थितीत फिर्यादीस परत करण्यात आली.

शंकरनगर असर्जन येथील रहिवासी पत्रकार तुकाराम सावंत हे १७ सप्टेंबर रोजी सकाळी ६:३० वाजता मॉर्निंग वॉकसाठी घरुन हस्सापूर पुल रस्त्याने पायी चालत असताना मोरगे सिमेंट प्लॉटच्या अलीकडे मिराईनगर पाटीजवळ गेले असता तेथे दोन अनोळखी इसमांनी सावंत याना खंजरचा धाक दाखवून फिर्यादीच्या गळयातील १ लाख ५६ हजार रुपये किमतीची सोन्याची चैन बळजबरीने तोडून घेवून नंबरप्लेट नसलेल्या मोटारसायकलवरुन निघून गेले. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात पोलीस उपमहानिरीक्षक शशिकांत महावरकर, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिध्देश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांनी त्यांच्या पथकाद्वारे आरोपींनी जबरी चोरुन नेलेली चैन जप्त करुन नांदेड जिल्हा दौऱ्यावर आलेले अप्पर पोलीस महासंचालक डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या उपस्थितीत परत करण्यात आली. यावेळी पोलिस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्यासह इतर पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

दिवस राखून ठेवला आहे.
- अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी

बांधाच्या भांडणाची कारवाई झालीच नाही.

होता. एस.पी. कोकाटे यांनी त्याचे म्हणणे एकून घेतले.

# शस्त्रांचा वापर, पोलिसांची आणखी एकावर कारवाई

**नांदेड :** जिल्ह्यात अवैधरीत्या शस्त्र बाळगण्याचे प्रमाण वाढले असून, पोलिस कारवाई करून हे शस्त्र जप्त करीत आहेत. २ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास असर्जन नाका पेट्रोल पंपाच्या समोरील रस्त्यावर एका युवकाच्या ताब्यात खंजीर आढळला. विनापरवाना शस्त्र बाळगल्याच्या आरोपावरून पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, शस्त्र जप्त केले आहे.